दि. 05-09-2001

## जिल्हा न्याययंत्रणा

~~एकेरी ... हे भारताच्या न्यायव्यवस्थेचे एक वैशिष्ट्ये आहे सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय जिल्हा न्यायालय आणि तालूका न्यायालय शिवे साधारणा न्यायव्यवस्थेचे स्वरूप पाहिवयास मिळते।~~

### प्रस्तावना -

लोकशाहीमध्ये न्याय यंत्रणेचे अनन्यसाधारण असे महत्व पाहवयास मिळते. कारण लोकशाहीत विशेषतः संसदीय लोकशाहीमध्ये न्यायंत्रणेला खूपच महत्व प्राप्त झालेले आहे. एकूणच देशाच्या प्रशासनात न्याय यंत्रणा ही महत्वाची संस्था मानली जाते. न्याय यंत्रणेचे महत्व स्पष्ट करताना आपणास खालील गोष्टीचा विचार करावा लागेल.

**(1) भारताने संघराज्याचा स्विकार केल्यामूळे -**

न्याय व्यवस्था भक्कम असणे अभिप्रेत होते कारण संघराज्याची प्रामूख्याने तिन वैशिष्ट्ये मानली जातात (1) केंद्र आणि राज्य यांच्यात अधिकाराची विभागणी (2) लिखीत राज्यघटना (3) समर्थ अशी न्याय यंत्रणा. कारण लिखीत राज्यघटनेचा अर्थ लावण्याचीच जबाबदारीच न्याय यंत्रणेवर असते. न्यायालयेच राज्यघटनेचा अर्थ स्पष्ट करीत असतात. थोडक्यात म्हणजे संघराज्य प्रणालीचा स्विकार करणाऱ्या देशात न्याय व्यवस्था ~~आणि~~ अपरिहार्य असते.

**(2) मूलभूत हक्काच्या रक्षणासाठी -**

न्यायालयाची नितांत आवश्यकता (आहे) असते. लोकशाहीत नागरीकाला व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी मूलभूत हक्क प्रदान केलेले असतात. परन्तू केवळ राज्यघटनेत मूलभूत हक्काची नोंद केली म्हणजे नागरीकाच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतोच असे नाही तर त्या साठी मूलभूत हक्काच्या रक्षणाची तरतूद करणे गरजेचे असते आणि हे

दि. 05-09-2001

रक्षण न्याययंत्रणा करीत असते.

(3) अल्पसंख्याकांच्या अधिकाराचे रक्षण -

आपल्या देशात विविध जाती, धर्म, वंश वर्ग असे विविध गट आहेत. यामध्ये काही अल्पसंख्याक सुध्दा आहेत. अशा अल्पसंख्याकावर अन्याय होवू नये यांची पिळवणूक होऊ नये यासाठी न्यायालयाची गरज असते कारण अल्पसंख्याकाना सुध्दा आपल्या अधिकाराचा उपभोग घेता आला पाहिजे.

(4) सामाजिक स्थैर्य -

सामाजिक स्थैर्यासाठी सुध्दा न्याय व्यवस्थेची आवश्यकता आहे कारण जो पर्यंत समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था असणार नाही. तो पर्यंत समाजाचा विकास होऊ शकणार नाही, म्हणूनच समाज विघातक कारवाया करणाऱ्यांना शिक्षा देणे, दंड ठोठावणे या साठी न्याययंत्रणा असते.

(5) आपल्या प्रशासनात सत्ता विभाजनाच्या सिध्दांताचा अवलंब करण्यात आला आहे.

यानुसार कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे शासनाचे तीन अंग परस्परापासून भिन्न ठेवण्यात आलेले आहेत. यातील प्रत्येक विभागाला स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. परंतू या स्वातंत्र्याचा अतिरेक झाल्यास शासन कार्य करू शकत नाही म्हणून कार्यकारी मंडळ किंवा कायदेमंडळ हुकूमशाही प्रवृत्तीचे बनू नये यासाठी न्यायमंडळाचा अंकुश या दोन्ही संस्थावर असणे गरजेचे आहे यामूळेच विधिमंडळाने केलेला कायदा हा जर राज्यघटनेशी विसंगत असेल तर त्याला रद्द करण्याचा अधिकार न्याय व्यवस्थेला आहे यामूळे कार्यकारी मंडळ किंवा कायदेमंडळ हुकूमशाह बनू शकत नाही.

या सर्व गोष्टी मूळे लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी समर्थ

दि. 07.9.2001

जिल्हा प्रशासन सुध्दा अपवाद नाहि कारण आपण एकेरी न्याय व्यवस्था स्विकारलेली आहे. सर्वोच्च न्यायालयापासून ते तालुका न्यायालयापर्यंत न्याय यंत्रणा कार्यरत आहे त्यामुळेच जिल्हा प्रशासनात सुध्दा न्यायालयाचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

## जिल्हा न्यायालयाचे स्वरूप -

एकेरी न्यायव्यवस्था हे भारताच्या न्यायव्यवस्थेचे एक वैशिष्ट्ये आहे सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालय असे साधारणपणे न्यायव्यवस्थेचे स्वरूप पाहवयास मिळते. यामध्ये जिल्हा पातळीवर असलेले जिल्हा न्यायालय हे जिल्हा प्रशासनाचे अविभाज्य अंग समजले जाते. या जिल्हा न्यायालयाच्या अधिनस्त पातळीवर जिल्ह्यातील तालुका न्यायालये कार्यरत असतात जिल्हास्तरावर प्रामुख्याने जिल्ह्यातील दिवाणी आणि फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणाचा न्याय निवाडा करण्यासाठी हसे जिल्हा न्यायालय असते - या जिल्हा न्यायालयात या दोन स्वरूपाच्या प्रकरणाशिवाय, मोटार अपघात विषयक प्रकरणे सुध्दा काहि जिल्हा न्यायालयामध्ये चालविली जातात फौजदारी प्रकरणे चालविण्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधिश व साहय्यक सत्र न्यायधीश याचे पदे निर्माण करण्यात आलेली असतात. दिवाणी स्वरूपाचे प्रकरणे चालविण्यासाठि सुध्दा साहय्यक न्यायाधिश नेमणूक केली जाते. या जिल्हा न्यायाधिशा व्यतिरिक्त तालुकाच्या ठिकाणी देखील अतिरिक्त सत्र न्यायालय कार्यरत असू शकते जसे की नांदेड जिल्ह्यात ~~[illegible]~~ बिलोली येथे येथे अतिरिक्त सत्र न्यायालय आहे जिल्हा न्यायालयावरील कार्य भार कमी व्हावा याकरिता अशा स्वरूपाच्या न्यायालयाची निर्मिती करण्यात

दि. 07-09-2001

येत : दिवाणी न्यायालयाचे दोन भाग करण्यात आलेले असतात. ज्याला दिवाणी न्यायालय ज्येष्ठ स्तर व दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर. ज्येष्ठ स्तर असलेल्या दिवाणी न्यायालयात जे दिवाणी दावे चालतात ते रुपये 5000 पेक्षा अधिक किंमतीचे असतात. या- पेक्षा कमी किंमत असलेले दिवाणी दावे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर येथे चालतात. जिल्हाधिकारी आणि जिल्हा न्यायधिश यांचे तसेच जवळचे संबंध असतात कारण कोणत्याही फौजदारी स्वरूपाचे खटले चालविण्याच्या दृष्टीने जी चौकशी होत असते ती जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या (जिल्हाधिकारी) नियंत्रणाखाली चालतात. त्यामुळेच जिल्हा प्रशासन व जिल्हा न्यायालय यांचे जवळचे संबंध असतात.

## जिल्हा न्यायालयाची निर्मिती व रचना

जिल्हा न्यायालयाची निर्मिती राज्यशासना- कडून करण्यात येत असते. तत्वत: जरी असे असले तरी परंतु राज्यसरकार अशा न्यायालयाची निर्मिती करीत असताना राज्याच्या उच्च न्यायालयाचा सल्ला घेत असतात त्यांच्याशी विचारविनिमय करीत असतात अशा निर्माण करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालयात एक प्रमुख न्यायाधिश, सह न्यायाधिश अतिरिक्त न्यायाधिश आणि कनिष्ठ न्यायाधिश असतो. जिल्हा न्यायालयातील प्रमुख न्याया- धिशाना जिल्हा न्यायाधिश असे संबोधले जाते हे जिल्हा न्यायाधिश जिल्हा न्यायालयातील प्रमुख असताना त्यांच्याच नियंत्रणाखाली आणि आदेशानूसार जिल्हा न्याया- लयातील तसेच जिल्ह्यातील न्यायालयातील कामक

दि. 07-09-2001

चालत असते दिवानी व फौजदारी न्यायालयावर जिल्हा न्यायाधिशाचे नियंत्रण असते प्रत्येक जिल्ह्यान्त्या ठिकाणी प्रामुख्याने दोन प्रकारची न्यायालये असतात. ज्याना दिवाणी न्यायालय व फौजदारी न्यायालय असे म्हंटले जाते या पूर्वीच विवेचन केल्या प्रमाणे काही जिल्यात अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश नेमले जातात. दिवाणी न्यायाधिश हे दिवाणी स्वरुपाचे प्रकरणे पाहत असतात तर फौजदारी स्वरुपाची प्रकरणे फौजदारी न्यायाधिश पाहत असतात. जिल्हा व सत्र न्यायालय यात फरक असतो. दिवाणी न्यायधिश जेव्हा जिल्हान्याया-लयामध्ये दिवाणी स्वरुपाचे खटले चालवित असतात तेव्हा अशा न्यायालयापुढे हे खटले चालत असल्यामूळे त्याला जिल्हा न्यायालय म्हणतात. अशा न्यायालयापूढे जेव्हा फौजदारी स्वरुपाची खटले चालत असतील तेव्हा त्याला सत्र न्यायालय असे म्हणतात. म्हणजे जिल्हा न्यायाधिशाला एकाचं वेळी दोन स्वरुपाची भूमीका करावी लागते.

<u>जिल्हा न्यायाधिश पदासाठी पात्रता</u>

1) तो भारताचा नागरिक असावा.

2) त्याला किमान 7 वर्षाचा वकीलाचा अनूभव असावा लागतो.

3) उच्च न्यायालयाची शिफारस आवश्यक आहे.

4) तो कोणत्याही शासकीय नौकरीमध्ये असू नये.

5) कोणत्याही गुन्ह्याबाबत त्या व्यक्तीला न्यायालयाने गुन्हेगार ठरविलेले असू नये.

Scanned with OKEN Scanner

दि. 07-09-2001

(7) वेतन अगर दिवाळखोर असू नये
(8) जिल्हा न्यायाधिश वयाच्या 62 व्या वर्षापर्यंत आपल्या पदावर राहू शकतात. त्यांना देण्यात येणारे वेतन संचित निधिमधून दिले जाते. शिवाय मोफत निवास स्थान, वाहन व्यवस्था (सरकारी वाहन) आणि सुरक्षितता अशा ही सुविधा पुरविल्या जातात. या पदावर बढती पद्धतीने तर जिल्हा न्यायाधिश म्हणून नेमणूक होवू शकते. तसेच स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून सुद्धा भरती होत असते. या पदाला आकर्षक वेतन देण्यात आले आहे.
न्यायाधिशांना जनसंपर्कापासून अलिप्त ठेवण्यात आलेले आहे. म्हणून त्यांना कोणत्याही सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभागी होता येत नाही. एकूण न्यायालयाची व न्यायाधीशांची प्रतिष्ठा कायम ठेवण्याचा प्रयत्न कायद्यातील तरतुदीने केलेला आहे अशा या जिल्हा न्यायालयाचे अधिकार क्षेत्र खालील प्रमाणे पाहता येईल.

## (1) प्रारंभिक अधिकार क्षेत्र -
प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणजे अशी प्रकरणे की जी सर्व प्रथम याच न्यायालयामध्ये प्रविष्ट होत असतात दिवाणी प्रकरणाचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास 15000 पेक्षा अधिक किंमतीचे जर एखादे प्रकरण असेल तर ते प्रथम जिल्हा न्यायालयात प्रविष्ट होत असते अशा सर्व दाव्यांची सुनावणी पहिल्यांदाच जिल्हा न्यायालयामध्ये केली जाते.

## (2) पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र -
जिल्हा न्यायालय हे पुनर्निर्णय

दि. 07-09-2001

लय म्हणूनही काम पाहत असते. एखाद्या अधिनस्त न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर पुन्हा ~~निर्णय~~ निर्णय देण्याचा जो अधिकार जिल्हा न्यायालयाला असतो. त्यालाच पूर्णनिर्णयाचा अधिकार असे म्हणतात. जसे की जिल्ह्यातील एखाद्या तालुका न्यायालयाने एखाद्या दिवाणी प्रकरणात जो न्याय निर्णय दिला आहे. तो जर पुर्ती पक्षाला मान्य नसेल तर असा व्यक्ती या निर्णयाच्या विरुध्दात जिल्हान्यायालयात अपिल करु शकतो असेच किरकोळ फौजदारी प्रकरणात सुध्दा आहे

(3) जिल्हा न्यायालय हे तालुक्यातील सर्व न्यायालयावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत असते. अशा न्यायालयातील कामकाजाची पाहणी करण्याचा अधिकार जिल्हा न्यायालयाला असतो

(4) जिल्ह्यातील विविध न्यायालयाला लागणाऱ्या कर्मचाऱ्याची निपूक्ती जिल्हा न्यायालया कडूनच होत असते त्याच बरोबर एका न्यायालयातून दुसऱ्या न्यायालयात जर एखाद्या कर्मचाऱ्याची बदली करावयाची असेल तर हा अधिकार सुध्दा याच न्यायालयाला आहे. तालुक्यातील न्यायाधिशाची बदली, बढती यासबधीचे निर्णय सुध्दा जिल्हा न्यायालय घेत असते

(5) ज्या प्रमाणे तालुका न्यायालयातून एखादे प्रकरण जिल्हान्यायालयात चालते त्याच प्रमाणेच जिल्हा न्यायालयातील एखादे प्रकरण जर उच्च न्यायालयाकडे पाठवायचे असेल तर उच्च न्यायालयात जाणाऱ्या खटल्यासंबंधी प्रमाण पत्र देण्याचा अधिकार जिल्हान्याया-लयाला आहे

(6) जिल्हा न्यायालयाचे महत्वाचे कार्य म्हणजे

दि. 07-09-2001

हे न्यायालय अभिलेख न्यायालय आहे. म्हणजे तालुक्यातील आणि जिल्हा पातळीवरील सर्व रेकार्ड हे न्यायालय जपून ठेवते.

(7) या न्यायालयाला फाशीची शिक्षा सुनावण्याचा अधिकार आहे. (उच्च न्यायालयाच्या संमतीने) जसे की काही वर्षापूर्वी घडलेले मंडकी हत्याकांडातील सुनावलेली फाशीची शिक्षा.

(8) न्यायालयाची बेअबरी (अवमानना) करणाऱ्या तसेच न्यायालयाच्या निर्णयाची पुकारणा करणाऱ्याना शिक्षा देण्याचा अधिकार जिल्हा न्यायालयाला आहे.

(9) न्यायालयाच्या संदर्भात वेळोवेळी जे आदेश वरिष्ठ कडून येतात त्यांचे पालन जिल्ह्यातील सर्व न्यायालये करता किंवा नाही. हे पाहण्याचा अधिकार न्यायालयास आहे

(10) वेळोवेळी जिल्ह्यातील न्यायालयाना भेटी देऊन तेथील कामकाजाची पाहणी करणे, तेथील दस्तावेजाची तपासणी करणे हा सुद्धा जिल्हा ~~न्यायालय~~ न्यायविशाला अधिकार आहे या साठी जिल्ह्यातर्फे काढून विविध न्यायालयाच्या कामकाजाची पाहणी केली जाते.

(11) लोकन्यायालय आणि कायदेविषयक साह्य व सल्लासमिती हे कार्यक्रम जिल्ह्यात प्रभावीरित्या राबविणे तालुका पातळीवर अशा प्रकारचे कार्यक्रम राबविले जात आहेत किंवा नाही ते पाहणे त्या माहिती मागवणे, लोकन्यायालयाचे व शिबिराचे वार्षिक वेळापत्रक तयार करणे अशा काही कार्यक्रमात

दि. 07-09-2001

उपस्थित राहणे अशीही काही कल्याणकारी कार्य जिल्हा न्यायालयाला करावी लागतात. कारण विधी सेवा प्राधिकरण कायदा अंमलात आल्यापासून जिल्हान्यायाधीश हे जिल्हा ~~सेवा~~ विधि सेवा प्राधिकरण समितीचे अध्यक्ष असतात आणि अध्यक्ष या नात्याने त्यांना ही सर्व कार्य पार पाडावी लागतात.

सांराक्ष रुपाने असे म्हणता येईल की, जिल्हा न्यायालयाला केवळ न्यायीक स्वरुपाचीच कार्य करावी लागतात असे नाही तर त्याचे बरोबर प्रशासकीय आणि कल्याणकारी स्वरुपाची कार्य सुध्दा पार पाडावी लागतात.

प्र. जिल्हान्यायालयाचे स्वरुप विशद करुन अधिकार आणि कार्य स्पष्ट करा.

(आजीच कोटी न्यायालयात केसेस प्रलंबीत आहेत)